सामाजिक शास्त्रे भाग – १

# भूगोल आणि अर्थशास्त्र

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमावर आधारित



## इयत्ता दहावी

(मराठी माध्यम)

Target Publications Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्याद्वारे नियोजित
अभ्यासक्रमावर आधारित

सामाजिक शास्त्रे भाग - २

# भूगोल आणि अर्थशास्त्र

## इयत्ता दहावी

Fourth Edition: April 2016

**ठळक वैशिष्ट्ये:**

- संपूर्ण अभ्यासक्रमाचा प्रश्न व उत्तरांच्या स्वरूपात परिपूर्ण आढावा
- पाठ्यपुस्तकातील सर्व प्रश्नांचा अचूक, मुद्देसूद उत्तरांसहित समावेश
- सरावासाठी अधिक प्रश्न व त्यांची उत्तरे
- सोपी व ओघवती भाषा
- प्रमाणभूत नकाशे आणि तक्ते
- प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी द्रुत पुनरावलोकन
- प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी सराव प्रश्नपत्रिकेचा समावेश
- बोर्डाच्या नवीन आराखड्यानुसार नमुना प्रश्नपत्रिका
- बोर्डाच्या २०१४, २०१५ आणि मार्च २०१६ च्या प्रश्नपत्रिकांचा समावेश

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 15893

**10207_10530_JUP**

# प्रस्तावना

नमस्कार विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,

इयत्ता दहावीत पदार्पण केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन ! तुम्ही नववीत गेल्यापासून या वर्षाचे वेध तुम्हाला लागले असतील. सगळ्यांनी सूचनांचा, सल्ल्यांचा, इतरांच्या दाखल्यांचा तुमच्यावर जणू काही माराच सुरू केला असेल; पण या सगळ्यांनी भांबावून जाऊ नका. आमचे मार्गदर्शन आणि तुमची मेहनत यांची सांगड घालून लागा कामाला !

विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी व त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी टार्गेट पब्लिकेशन्सचे **'इयत्ता दहावी : भूगोल आणि अर्थशास्त्र'** हे दर्जेदार मार्गदर्शनपर पुस्तक आम्ही सादर करत आहोत. या पुस्तकात संपूर्ण अभ्यासक्रम प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात दिला गेला आहे. संकल्पना व्यवस्थित समजण्यासाठी प्रत्येक घटकाची उपघटकांत विभागणी केली आहे. हे पुस्तक केवळ संकल्पना समजण्यासाठीच नव्हे, तर त्या संकल्पनांवर आधारित उत्तरे लिहिण्यासाठी देखील मदत करते. पुस्तकात उत्तरात आवश्यक तेथे नकाशे व तक्ते देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या सरावासाठी नकाशावाचन व नकाशा भरणे यावरील प्रश्न सुद्धा देण्यात आले आहेत. सहज व जलद उजळणीकरिता प्रत्येक पाठाच्या शेवटी द्रुत पुनरावलोकन तसेच अर्थशास्त्राच्या पाठांच्या शेवटी पारिभाषिक शब्दांचे अर्थ देण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त प्रत्येक पाठाच्या शेवटी नमुना प्रश्नपत्रिका [भूगोल : २० गुण आणि अर्थशास्त्र : १० गुण] देण्यात आल्या आहेत; ज्यामुळे विद्यार्थ्यांना उजळणी व सराव करता येईल. पुस्तकात बोर्डाच्या प्रश्नपत्रिका, आराखड्यावर आधारित दोन नमुना प्रश्नपत्रिका तसेच बोर्डाच्या २०१४, २०१५ व मार्च २०१६ च्या प्रश्नपत्रिकाही देण्यात आल्या आहेत.

टार्गेट पब्लिकेशन्सचे 'भूगोल आणि अर्थशास्त्र' हे पुस्तक पालकांना विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनासाठी उपयुक्त ठरून विद्यार्थ्यांना सुयोग्य मार्गदर्शन करेल व परीक्षेत हमखास यश मिळवून देईल, असा आमचा दृढ विश्वास आहे.

तुमचे अभिप्राय व सूचना या दोन्हींची आम्ही वाट पाहत आहोत.

email : mail@targetpublications.org

अथक परिश्रम हीच यशाची गुरूकिल्ली आहे. चला तर मग, लागू या अभ्यासाला कंबर कसून.

**धन्यवाद!**

**परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा !**

**प्रकाशक**

# प्रश्नपत्रिका आराखडा

## भूगोल

प्र.१. (अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. (३)

३ विधाने दिली जातील. (प्रत्येकी १ गुण)

(ब) 'अ' स्तंभातील घटकांच्या 'ब' स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा. (३)

३ योग्य जोड्या जुळवणे. (प्रत्येकी १ गुण)

प्र.२. (अ) भौगोलिक कारणे लिहा. (४)

४ प्रश्न दिले जातील. त्यांपैकी २ ची उत्तरे लिहावी. (प्रत्येकी २ गुण)

(ब) टिपा लिहा. (४)

३ प्रश्न दिले जातील. त्यांपैकी २ ची उत्तरे लिहावी. (प्रत्येकी २ गुण)

प्र.३. (अ) दिलेल्या सांख्यिकी माहितीच्या आधारे आलेख / आकृती काढा. (२)

या प्रश्नाला विकल्प नाही. (२ गुण)

(ब) नकाशा वाचन. (२)

४ प्रश्न दिले जातील. त्यांपैकी २ ची उत्तरे लिहावी. (प्रत्येकी १ गुण)

(क) नकाशा आराखड्यात पुढील बाबी दाखवा. (२)

४ बाबी दिल्या जातील. त्यांपैकी २ नकाशात दाखवाव्या. (प्रत्येकी १ गुण)

प्र.४. सविस्तर उत्तरे लिहा. (८)

३ प्रश्न दिले जातील. त्यांपैकी २ ची उत्तरे लिहावी. (प्रत्येकी ४ गुण)

[नकाशा भरणे – १ गुण व मुद्दे – ३ गुण]

## अर्थशास्त्र

प्र.५. रिकाम्या जागी योग्य तो पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा. (२)

२ विधाने दिली जातील. (प्रत्येकी १ गुण)

प्र.६. एक ते दोन वाक्यांत उत्तरे द्या. (६)

५ प्रश्न दिले जातील. त्यापैकी ३ ची उत्तरे लिहावी. (प्रत्येकी २ गुण)

प्र.७. पुढील कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा. (४)

२ प्रश्न दिले जातील. एकाचे उत्तर लिहावे. (प्रत्येकी ४ गुण)

---

**एकूण गुण** ४०

---

# पाठानुसार गुणविभागणी

## भूगोल

| क्र. | नाव | गुण | विकल्पांसह गुण |
|---|---|---|---|
| १. | भारतातील प्राकृतिक विभाग | ०३ | ०४ |
| २. | उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश | ०४ | ०६ |
| ३. | उत्तरेकडील मैदानी प्रदेश | ०७ | ११ |
| ४. | द्वीपकल्पीय पठारी प्रदेश | ०४ | ०६ |
| ५. | घाट, किनारी मैदाने आणि बेटे | ०६ | ०९ |
| ६. | प्रात्यक्षिक भूगोल | ०४ | ०६ |
| | **एकूण** | **२८** | **४२** |

## अर्थशास्त्र

| क्र. | नाव | गुण | विकल्पांसह गुण |
|---|---|---|---|
| १. | अर्थव्यवस्थेची ओळख | ०२ | ०२ |
| २. | अर्थव्यवस्थेच्या मूलभूत समस्या व उपाययोजना | ०२ | ०२ |
| ३. | भाववाढ | ०४ | ०८ |
| ४. | सार्वजनिक वितरण प्रणाली व ग्राहक संरक्षण | ०४ | ०८ |
| | **एकूण** | **१२** | **२०** |

# अनुक्रमणिका


| क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **भूगोल** | |
| १ | भारतातील प्राकृतिक विभाग | १ |
| २ | उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश | १७ |
| ३ | उत्तरेकडील मैदानी प्रदेश - वाळवंट | ३८ |
| ४ | उत्तरेकडील मैदानी प्रदेश - पश्चिम (पंजाब व हरियाणा) | ५७ |
| ५ | उत्तरेकडील मैदानी प्रदेश - मध्यवर्तीय, त्रिभुज व पूर्वीय | ७१ |
| ६ | द्वीपकल्पीय पठारी प्रदेश - मध्यवर्ती उच्चभूमी | ९३ |
| ७ | द्वीपकल्पीय पठारी प्रदेश - दख्खन | १११ |
| ८ | घाट, किनारी मैदाने आणि बेटे | १२८ |
| ९ | प्रात्यक्षिक भूगोल | १५८ |

| | अर्थशास्त्र | |
|---|---|---|
| १ | अर्थव्यवस्थेची ओळख | १७४ |
| २ | अर्थव्यवस्थेच्या मूलभूत समस्या व उपाययोजना | १८१ |
| ३ | भाववाढ | १८८ |
| ४ | सार्वजनिक वितरण प्रणाली व ग्राहक संरक्षण | १९७ |
| | नमुना प्रश्नपत्रिका – १ | २०७ |
| | नमुना प्रश्नपत्रिका – २ | २१० |
| | बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१४ | २१३ |
| | बोर्ड प्रश्नपत्रिका : ऑक्टोबर २०१४ | २१६ |
| | बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१५ | २१९ |
| | बोर्ड प्रश्नपत्रिका : जुलै २०१५ | २२२ |
| | बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१६ | २२५ |


**टीप : पाठ्यपुस्तकातील प्रश्न * या चिन्हाने दर्शविले आहेत.**

# ०१ भारतातील प्राकृतिक विभाग

**प्र.१.अ.कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

**१.१ प्रस्तावना**

१. आर्य आणि ________ यांचे समिलीकरण झाल्यामुळे अभिजात भारतीय संस्कृती उदयाला आली आहे.
(अरब, तुर्की, **द्रविड**, युरोपियन)

२. ८ व्या शतकात ________ हे भारतात आले.
(आर्य, तुर्की, **अरब**, युरोपियन)

३. ________ शतकाच्या उत्तरार्धात युरोपियन व्यापारी भारतात आले.
(६ व्या, १० व्या, १३ व्या, **१५ व्या**)

४. भारताचा विस्तार उत्तरेकडील ________ पासून ते दक्षिणेला ________ पर्यंत आहे.
(**हिमालया; कन्याकुमारी,** अरवली; श्रीलंके, पंजाब; केरळ, गुजरात; आसाम)

५. भारताच्या राज्यघटनेने ________ हे अधिकृत नाव स्वीकारलेले आहे.
(हिंदुस्तान, सौराष्ट्र, **भारत**, हिंद)

६. भारत हा ________ प्रधान देश आहे.
(समाजवादी, भांडवलशाही, **लोकशाही**, साम्यवादी)

७. भारतात ________ घटक राज्ये आणि ________ केंद्रशासित प्रदेश आहे.
(१८;७, **२८;७**, २५; १०, ३५; १०)

**सूचना:** [सध्या भारतात २९ घटक राज्ये आहेत.]

*८. क्षेत्रफळाच्या दृष्टीने ________ हे भारतातील सर्वांत मोठे राज्य आहे. **[मार्च १५]**
(मध्य प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, **राजस्थान**)

९. क्षेत्रफळाच्या दृष्टीने ________ हे भारतातील सर्वांत लहान राज्य आहे.
(मिझोराम, **गोवा**, त्रिपुरा, आसाम)

**१.२ स्थान आणि विस्तार**

१०. भारत हे राष्ट्र आशिया खंडाच्या दक्षिण भागात ________ आहे.
(उजवीकडे, डावीकडे, **मध्यवर्ती**, उंचावर)

११. ________ वृत्त भारताच्या मध्यभागातून जाते.
(मकर, **कर्क**, मेष, वृश्चिक)

१२. ________ जवळ सर्वांत मोठा दिवस व सर्वांत लहान दिवस यांच्यातील फरक सुमारे ४५ मिनिटांचा आहे.
(लेह, लडाख, **कन्याकुमारी**, किबिथू)

१३. ________ मधून जाणारे ८२°३०′ पूर्व रेखावृत्त हे प्रमाण रेखावृत्त असून भारताची प्रमाण वेळ ही त्याच्या स्थानिक वेळेनुसार निश्चित केली आहे.
(हैद्राबाद, **अलाहाबाद**, गुजरात, कोलकाता)

*१४. क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारत हा जगातील ________ क्रमांकाचा मोठा देश आहे. **[ऑक्टोबर १४, मार्च १५]**
(पाचव्या, सहाव्या, **सातव्या**, चौथ्या)

१५. भारताची भू-सीमा सुमारे ________ लांबीची आहे.
(**१५२०० किमी,** ७५१७ किमी, ७२०० किमी, १८२०० किमी)

१६. भारताचा सागरी किनारा सुमारे ______ लांबीचा आहे.
(९००० किमी, **७५१७ किमी**, ६५१७ किमी, ९५१७ किमी)

**१.३ सभोवतालची राष्ट्रे**

१७. ________ हे भारतीय राज्य अफगाणिस्तानच्या सीमेशी संलग्न आहे.
(**जम्मू आणि काश्मीर**, पंजाब, गुजरात, राजस्थान)

१८. सिक्कीम, पश्चिम बंगाल, आसाम, अरुणाचल प्रदेश या राज्यांची सीमारेषा ________ या देशाशी संलग्न आहे.
(म्यानमार, **भूतान**, बांग्लादेश, चीन)

*१९. भारतीय द्वीपकल्पाचे दक्षिण टोक ________ आहे. **[मार्च १४]**
(चेन्नई, तिरुवअनंतपुरम, **कन्याकुमारी**, मदुराई)

२०. श्रीलंका हे ________ आणि पाल्कची अरुंद सामुद्रधुनी यांच्यामुळे भारतापासून वेगळे झाले आहे.
(**मानारचे आखात**, लडाखचे आखात, लेहचे आखात, कच्छचे आखात)

२१. भारताची सध्याची प्राकृतिक रचना ही ________ प्रक्रियेचा परिणाम आहे.
(शरीरक्रियाविज्ञान, भौतिक, **भूवैज्ञानिक**, भौगोलिक)

२२. सुरुवातीच्या काळात सर्व भूप्रदेशांचे एकच वैश्विक महाखंड ________ या नावाने ओळखले जात होते.
(लॉरेशिया, गोंडवन, **पॅन्जिया**, टेथिस)

२३. पॅन्जिया, हा महाखंड उत्तर लॉरेशिया आणि दक्षिण ________ प्रदेश म्हणून विभागला गेला होता.
(आशिया, **गोंडवन**, अंटार्क्टिका, आफ्रिका)

२४. ________ मुळे गोंडवन भूभागाचे विभाजन झाले.
(**ऊर्ध्वगामी प्रवाह**, निक्षेपण, अपक्षरण, अपक्षय)

२५. गोंडवन भूभागापासून अलग झाल्यावर इंडो-ऑस्ट्रेलियन भूपट्टा ____ वाहत गेला.
(पूर्वेकडे, पश्चिमेकडे, **उत्तरेकडे**, दक्षिणेकडे)

२६. भूविज्ञानदृष्ट्या ________ हा सर्वांत प्राचीन भाग आहे आणि सर्व भूविज्ञान घडामोडींचे केंद्रस्थान आहे.
(हिमालय पर्वतरांगा, गंगेचे मैदान, **द्वीपकल्पीय पठार**, इंडो-तिबेटीयन प्रदेश)

२७. ________ भूपट्ट्याच्या उत्तर दिशेकडे सरकण्यामुळे भारतीय उपखंडाचा आकार आणि स्थान बदलत राहिले.
(**इंडो-ऑस्ट्रेलियन**, युरेशियन, लॉरेशियन, इंडो-गॅंगेटीक)

२८. ________ पासून वेगळा होऊन वहन होण्यापूर्वी अरवली पर्वत हा दक्षिणेकडील मोठ्या भूभागाचा एक भाग होता.
(आफ्रिके, दक्षिण अमेरिके, लॉरेशिया, **गोंडवन प्रदेशा**)

## १.४ प्रदेश निश्चितीची प्रक्रिया

२९. ________ हा प्रादेशिक दृष्टिकोनाचा पाया आहे.
(असमानता, **एकजिनसीपणा**, अनेकजिनसी, विविधता)

३०. _______ घटक इतर घटकांच्या तुलनेत स्थितिशील असतात.
(**प्राकृतिक**, रासायनिक, जैविक, शरीर-रासायनिक)

३१. ________ घटक हे प्रादेशिक नियोजन व विकास यांसाठी मूलभूत मानले जातात.
(**प्राकृतिक**, रासायनिक, जैविक, जैव-रासायनिक)

## १.५ प्राकृतिक विभाग

*३२. भारताचा सर्वाधिक भूभाग ________ व्यापला आहे.
(पर्वताने, मैदान प्रदेशाने, **प्राचीन पठाराने**, वाळवंटाने)

३३. ________ हा जगातील सर्वांत अर्वाचीन उंच उठावाचा प्रदेश आहे.
(अरवली, सातपुडा, सह्याद्री, **हिमालय**)

३४. ________ चा गाभा कणाश्म खडकांनी बनलेला असून त्याच्या दुतर्फा रूपांतरित झालेले गाळाचे खडक आहेत.
(उत्तरेकडील मैदाना, **हिमालया,** भारतीय द्वीपकल्पीय पठारा, पश्चिम किनारी मैदानी प्रदेशा)

३५. ________ म्हणजे गाळाच्या मृदेचा एक सलग पट्टा आहे, ज्याची जाडी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाढत जाते.
(हिमालय, **उत्तरेकडील मैदाने**, भारतीय द्वीपकल्पीय पठार, बेट)

३६. ________ भारतातील शेती व्यवसायाच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचा आहे.
(हिमालय, बेटे, **उत्तरेकडील मैदानी प्रदेश**, भारतीय पठार)

३७. ______ विभागात लोकसंख्येची घनता अधिक आहे.
(हिमालय, बेटे**, उत्तरेकडील मैदान**, भारतीय पठार)

३८. ________ हे जगातील सर्वांत प्राचीन भूभागांपैकी एक आहे आणि ते स्थिर आहे.
(हिमालय, उत्तरेकडील मैदानी प्रदेश, बेटे, **भारतीय पठार**)

३९. द्वीपकल्पीय पठाराचा आकार ________ आहे.
(**त्रिकोणी**, चौकोनी, षट्कोनी, पंचकोनी)

४०. क्षितिजसमांतर पसरलेला घनरूप लाव्हाचा थर हे ________ प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे.
(किनारी मैदानी प्रदेश, हिमालय, **द्वीपकल्पीय पठारी,** उत्तरेकडील मैदानी)

४१. अरबी समुद्रातील बेटांचा समूह भारताच्या नैऋत्य किनाऱ्यापासून ________ किमी दूर स्थित आहे.
(३०० ते ५५०, १०० ते १५०, **२०० ते ४४०**, ५०० ते ७५०)

४२. ________ हा भारताचा सर्वांत लहान केंद्रशासित प्रदेश आहे.
(हिमालय, उत्तर भारतीय मैदाने, **अरबी समुद्रातील बेटे**, बंगालच्या उपसागरातील बेटे)

४३. अरबी समुद्रातील बेटांचे एकूण भूपृष्ठीय क्षेत्रफळ ________ चौकिमी आहे.
(२०, ६०, **३२**, ४२)

४४. अरबी समुद्रातील बेटांची राजधानी ________ आहे.
(मुंबई, तिरुवअनंतपुरम, **कवरत्ती**, एर्नाकुलम)

४५. ________ जवळजवळ सपाट आहे फक्त त्याच्या उत्तरेला टेकड्यांची रांग आहे.
(उत्तर अंदमान, हिमालय, **छोटा अंदमान**, उत्तरेकडील मैदानी प्रदेश)

## ब. 'अ' स्तंभातील घटकांशी 'ब' स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा.

१.

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| i. | शेती प्रदेश | अ. | तालुका |
| ii. | प्रशासकीय प्रदेश | ब. | लोकसंख्या |
| iii. | आर्थिक प्रदेश | क. | पिके |
| iv. | सामाजिक प्रदेश | ड. | हवामान |
| | | इ. | उद्योगधंदे |

**उत्तरे:** (i – क), (ii – अ), (iii – इ), (iv – ब)

*२.

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| i. | गोवा | अ. | गोदावरीचा त्रिभुज प्रदेश |
| ii. | लक्षद्वीप | ब. | सर्वांत लहान राज्य |
| iii. | अतिप्राचीन भूभाग | क. | भारताचे दक्षिण टोक |
| iv. | पूर्व किनारी मैदान | ड. | सर्वांत मोठे राज्य |
| v. | इंदिरा पॉईंट | इ. | द्वीपकल्पीय पठार |
| | | फ. | केंद्रशासित प्रदेश |

**उत्तरे:** (i – ब), (ii – फ), (iii – इ), (iv – अ), (v – क)

३.

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| i. | द्वीपकल्पीय पठार | अ. | अरुणाचल प्रदेश |
| ii. | उत्तरेकडील मैदाने | ब. | भारतातील सर्वांत मोठा नैसर्गिक विभाग |
| iii. | किबिथू | क. | गाळाच्या मृदेचा पट्टा |
| iv. | घुअर मोटा | ड. | चंदीगढ शहर |
| | | इ. | गुजरात |

**उत्तरे:** (i. – ब), (ii. – क), (iii. – अ), (iv. – इ)

## प्र.२. थोडक्यात उत्तरे लिहा.(स्वयंअध्ययनासाठी प्रश्न)

### १.१ प्रस्तावना

**१. भारतात तुर्की केव्हा आले?**

**उत्तर:** भारतात तुर्की १२ व्या शतकात आले.

**२. कोणत्या नैसर्गिक घटकांनी भारताच्या प्रगतीत भर घातली आहे?**

**उत्तर:** भारतात विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती आहे जसे सूर्यप्रकाश, सुपीक मृदा, पाणी, खनिजे, वनस्पती, प्राणिजीवन इत्यादी या सर्व घटकांनी भारताच्या प्रगतीत भर घातली आहे.

**३. क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतातील तीन मोठी राज्ये कोणती?**

**उत्तर:** राजस्थान हे देशातील सर्वांत मोठे राज्य आहे व त्यानंतर मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राचा क्रमांक लागतो.

### १.२ स्थान आणि विस्तार

**४. भारताचे स्थान कोणत्या गोलार्धात आहे?**

**उत्तर:** भारताचे स्थान उत्तर आणि पूर्व गोलार्धात आहे.

**५. अक्षवृत्तीय विस्ताराचा प्रभाव कोणत्या नैसर्गिक घटकांवर पडतो?**

**उत्तर:** अक्षवृत्तीय विस्ताराचा प्रभाव पर्जन्यमान, तापमान आणि दिवस-रात्रीचा कालावधी या नैसर्गिक घटकांवर पडतो.

**६. कोणते नैसर्गिक घटक रेखावृत्तीय विस्तारानुसार ठरतात?**

**उत्तर:** स्थानिक वेळ, सूर्योदय, सूर्यास्त इत्यादी नैसर्गिक घटक रेखावृत्तीय विस्तारानुसार ठरतात.

**७. सर्वांत मोठा दिवस व सर्वांत लहान दिवस यांच्यातील फरक लडाख प्रदेशातील लेह येथे किती तासांचा आहे?**

**उत्तर:** सर्वांत मोठा दिवस व सर्वांत लहान दिवस यांच्यातील फरक लडाख प्रदेशातील लेह येथे सुमारे ४ तासांचा आहे.

**८. किबिथू गाव (अरुणाचल प्रदेश) आणि घुअर मोटा (गुजरात) येथील सूर्योदयातील वेळेत किती मिनिटांचा फरक आहे?**

**उत्तर:** किबिथू गाव (अरुणाचल प्रदेश) आणि घुअर मोटा (गुजरात) येथील सूर्योदयातील वेळेचा फरक सुमारे ११६ मिनिटांचा आहे.

**९. कोणत्या प्रमाण रेखावृत्तानुसार भारताची प्रमाण वेळ निश्चित केली आहे?**

**उत्तर:** अलाहाबादमधून जाणारे ८२° ३०′ पूर्व रेखावृत्त हे आपले प्रमाण रेखावृत्त आहे. भारताची प्रमाण वेळ ही अलाहाबादच्या स्थानिक वेळेनुसार निश्चित केली आहे.

**१०. भारताचे एकूण क्षेत्रफळ किती आहे?**

**उत्तर:** भारताचे एकूण क्षेत्रफळ ३२,८७,२६३ चौकिमी आहे.

**११. गुजरातच्या पश्चिमेकडील टोकापासून ते अरुणाचल प्रदेशाच्या पूर्व टोकापर्यंतचे अंतर किती आहे?**

**उत्तर:** गुजरातच्या पश्चिमेकडील टोक (घुअर मोटा) पासून ते अरुणाचल प्रदेशाचे पूर्व टोक (किबिथू गाव) पर्यंतचे अंतर २९९३ किलोमीटर आहे.

**१२. काश्मीरच्या उत्तर टोकापासून ते मुख्य भूमीचे दक्षिण टोक (कन्याकुमारी) पर्यंतचे अंतर किती आहे?**

**उत्तर:** काश्मीरच्या उत्तर टोकापासून ते मुख्य भूमीचे दक्षिण टोक म्हणजेच कन्याकुमारीपर्यंतचे अंतर ३२१४ किलोमीटर आहे.

## १.३ सभोवतालची राष्ट्रे

**१३. भारताच्या सागरी सीमा कोणत्या देशांशी संलग्न आहेत?**

**उत्तर:** भारताच्या सागरी सीमा या पाकिस्तान, श्रीलंका, मालदीव, बांग्लादेश, म्यानमार आणि इंडोनेशिया या देशांशी संलग्न आहेत.

**१४. भारताचे भूवैज्ञानिकदृष्ट्या तीन विभाग कोणते?**

**उत्तर:** भारताचे भूवैज्ञानिकदृष्ट्या सर्वसाधारण तीन विभाग आहेत.

i. हिमालय पर्वतरांगा ii. उत्तरेकडील मैदान
iii. द्वीपकल्पीय पठार

**१५. गोंडवन भूभागात कोणत्या प्रदेशांचा समावेश होता?**

**उत्तर:** गोंडवन भूभागात दक्षिण अमेरिका, आफ्रिका, भारत, ऑस्ट्रेलिया आणि अंटार्क्टिका या प्रदेशांचा समावेश होता.

**१६. भूवैज्ञानिकदृष्ट्या आजचा भारत निर्माण होण्यासाठी कोणत्या प्रक्रिया जबाबदार आहेत?**

**उत्तर:** भूवैज्ञानिक घडामोडींसोबत अपक्षय, अपक्षरण आणि निक्षेपण यांसारख्या प्रक्रिया आजचा भारत निर्माण होण्यासाठी जबाबदार आहेत.

**१७. कोणत्या भूपट्ट्यांच्या टकरीतून हिमालय पर्वताची निर्मिती झाली आहे?**

**उत्तर:** इंडो-ऑस्ट्रेलियन भूपट्टा आणि युरेशियन भूपट्टा यांच्या टकरेमुळे टेथिस सागराच्या तळाशी तयार झालेले गाळाचे खडक घडीच्या रूपाने वर आले व हिमालय पर्वताची निर्मिती झाली.

**१८. भारत देशात आढळणाऱ्या पृथ्वीवरील सर्व प्रमुख प्राकृतिक वैशिष्ट्यांची यादी लिहा.**

**उत्तर:** भारत देशात पृथ्वीवरील सर्व प्रमुख प्राकृतिक वैशिष्ट्ये जसे पर्वत, मैदाने, वाळवंटे, पठारे आणि बेटे आढळतात.

**१९. हिमालय पर्वताची उंची अद्यापही का वाढत आहे?**

**उत्तर:** भूअंतर्गत भागात सतत होणाऱ्या हालचालींमुळे हिमालयाची उंची अद्यापही वाढत आहे.

**२०. कोणत्या प्रकारचे खडक अरवली पर्वतरांगांत सापडतात?**

**उत्तर:** अरवली पर्वतरांगांत सर्वाधिक जुने पट्टिताश्म आणि कणाश्म खडक सापडतात.

## १.४ प्रदेश निश्चितीची प्रक्रिया

**२१. प्राकृतिक प्रदेश कसे ओळखता येतात?**

**उत्तर:** प्राकृतिक प्रदेश हे प्राकृतिक घटकांच्या आधारे जसे उत्पत्ती, स्थान, उठाव, खडकांचे प्रकार, भूरूपे, हवामान, मृदा, वने इ. आधारे ओळखले जातात.

**२२. भौगोलिक प्रदेशांच्या आणि प्रशासकीय किंवा राजकीय प्रदेशांच्या सीमांच्या नकाशा आरेखनामध्ये काय फरक असतो?**

**उत्तर:** भौगोलिक प्रदेशांच्या सीमा नकाशांवर कच्च्या स्वरूपात आखलेल्या असतात; कारण त्या बहुधा संक्रमणावस्थेतील विभागांच्या असतात; तर दुसरीकडे, राजकीय आणि प्रशासकीय प्रदेशांच्या सीमा सुविहितपणे आखलेल्या असतात आणि त्या नकाशावर अचूकपणे दाखवलेल्या असतात.

**२३. प्रादेशिकीकरण म्हणजे काय?**

**उत्तर:** क्षेत्राला अनेक छोट्या विभागांमध्ये विभागण्याच्या प्रक्रियेला प्रादेशिकीकरण म्हणतात.

**२४. प्रशासकीय प्रदेशांची श्रेणीरचना कशी असते?**

**उत्तर:** प्रशासकीय प्रदेशांची श्रेणीरचना ही देश, राज्य, जिल्हा, तालुका, गट यांप्रमाणे असते.

## १.५ प्राकृतिक विभाग

**२५. प्राचीन पठार व तुलनेने नवीन असलेले भाग यांच्यात कोणता फरक आढळतो?**

**उत्तर:** प्राचीन पठारापेक्षा तुलनेने नवीन असलेल्या भागात खूप उंच उठाव, कमी उंचीची मैदाने, उष्ण व शीत हवामान, कोरडे व दमट हवामान, नापीक आणि सुपीक मृदा, जास्त व कमी पर्जन्यमान इ. वैशिष्ट्यपूर्ण रचना आहेत.

**२६. कोणत्या आधारावर भारताचे प्रमुख पाच विभाग पडतात?**

**उत्तर:** संरचना, भूरूपे, हवामान, मृदा, नैसर्गिक वनस्पती, लोकसंख्या आणि वसाहतीचा आकृतीबंध, सांस्कृतिक पैलू, आर्थिक विकास इत्यादींवर आधारित भारताचे स्थूलमानाने पाच विभाग पडतात.

**२७. कोणत्या प्रकारचे खडक भारतीय द्वीपकल्पीय पठारावर आढळून येतात?**

**उत्तर:** प्राचीन अग्निजन्य व रूपांतरित प्रकारचे खडक भारतीय द्वीपकल्पीय पठारावर आढळून येतात.

**२८. कोणत्या प्रकारची भूरूपे भारतीय द्वीपकल्पीय पठारावर दिसून येतात?**

**उत्तर:** खडकाळ टेकड्या, पठारे, विखुरलेल्या कमी उंचीच्या टेकड्या आणि अनेक प्रस्तरभंग भारतीय द्वीपकल्पीय पठारावर दिसून येतात.

**२९. पूर्व किनारी मैदानी प्रदेशाची काय वैशिष्ट्ये आहेत?**

**उत्तर:** त्रिभुज मैदाने हे पूर्वेकडील किनारी प्रदेशांचे वैशिष्ट्य आहे. महानदी, गोदावरी, कृष्णा आणि कावेरी इत्यादी नद्यांमुळे तयार झालेले विस्तृत त्रिभुज प्रदेश या भागात आढळतात.

**३०. अरबी समुद्रात कोणती बेटे आढळून येतात?**

**उत्तर:** लक्षद्वीप, मिनिकॉय आणि अमिनदिवी ही बेटे अरबी समुद्रात आढळून येतात.

**३१. भारतातील प्राकृतिक विभागांची नावे लिहा.**

**उत्तर:** भारतातील प्राकृतिक विभाग पुढीलप्रमाणे:

i. उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश
ii. उत्तरेकडील मैदानी प्रदेश
iii. द्वीपकल्पीय पठारी प्रदेश
iv. किनारी मैदानी प्रदेश
v. बेटे

**३२. भारतीय प्राकृतिक विभाग/प्रदेश व उपविभागाची नावे द्या.**

**उत्तर:** भारताचे प्राकृतिक विभाग आणि उपविभाग खालीलप्रमाणे:

| | विभाग | उपविभाग |
|---|---|---|
| i. | उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश | पश्चिम हिमालय, मध्य हिमालय, पूर्व हिमालय |
| ii. | उत्तरेकडील मैदानी प्रदेश | वाळवंट, पश्चिम मैदान, मध्यवर्ती मैदान, त्रिभुज प्रदेश, पूर्वीय मैदान |
| iii. | द्वीपकल्पीय पठारी प्रदेश | मध्यवर्ती उच्चभूमी, दख्खनचे पठार |
| iv. | घाट आणि किनारी मैदानी प्रदेश | पश्चिम घाट, पूर्व घाट, पश्चिम किनारी मैदानी प्रदेश, पूर्व किनारी मैदानी प्रदेश |
| v. | बेटे | अरबी समुद्रातील बेटे, बंगालच्या उपसागरातील बेटे |

**३३. टक्केवारीप्रमाणे भारतातील प्राकृतिक विभागाच्या विभाजनाची माहिती द्या.**

**उत्तर:** टक्केवारीनुसार प्राकृतिक विभागाचे विभाजन खालीलप्रमाणे:

i. उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश – १५%
ii. उत्तरेकडील मैदानी प्रदेश – ३२%
iii. भारतीय पठारी प्रदेश, घाट, किनारी मैदानी प्रदेश व बेटे – ५३%

## प्र.३. टिपा लिहा.

### १.२ स्थान आणि विस्तार

**१. भारताचे स्थान आणि विस्तार**

**उत्तर:** i. भारताचे स्थान उत्तर आणि पूर्व गोलार्धात आहे.

ii. ते आशिया खंडाच्या दक्षिण भागात मध्यवर्ती ठिकाणी आहे.

iii. कर्कवृत्त भारताच्या मध्यभागातून (२३ $^{१}/_{२}$° उ) जाते.

iv. भारताच्या मुख्य भूप्रदेशाचा अक्षवृत्तीय विस्तार ८°४'२८'' उत्तर ते ३७°६'५३'' उत्तर आहे. याप्रमाणे त्याचा अक्षवृत्तीय विस्तार २९°२'२५'' इतका आहे.

v. भारताचे दक्षिण टोक हे ६°४५' उत्तर अक्षवृत्तावर असून ते इंदिरा पॉइंट या नावाने ओळखले जाते.

vi. भारताचा रेखावृत्तीय विस्तार ६८°७'३३'' ते ९७°२४'४७'' पूर्व असा आहे. याप्रमाणे त्याचा रेखावृत्तीय विस्तार २९°१७'१४'' आहे.

vii. अक्षवृत्तीय विस्ताराचा प्रभाव पर्जन्यमान, तापमान आणि दिवस-रात्रीच्या कालावधीवर पडतो आणि रेखावृत्तीय विस्तारामुळे स्थानिक वेळ बदलते. तसेच सूर्योदय व सूर्यास्त यांच्या वेळा ठरतात.

### १.३ सभोवतालची राष्ट्रे

***२. भारताच्या भू-सीमा**

**उत्तर:** i. भारताची भू-सीमा सुमारे १५,२०० किमी लांबीची आहे.

ii. पाकिस्तान, अफगाणिस्तान, चीन, नेपाळ, भूतान, म्यानमार आणि बांग्लादेश या शेजारी देशांची सीमारेषा भारतीय राज्यांच्या सीमारेषांशी संलग्न आहे.

iii. पाकिस्तानची सीमारेषा ही गुजरात, राजस्थान, पंजाब आणि जम्मू-काश्मीर या राज्यांच्या सीमा रेषांशी संलग्न आहे.

iv. अफगाणिस्तान या राष्ट्राची सीमारेषा जम्मू-काश्मीर या राज्याच्या सीमेशी संलग्न आहे.

v. चीन या राष्ट्राची सीमारेषा ही जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांच्या सीमेशी संलग्न आहे.

vi. उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीम या राज्यांची भू-सीमा नेपाळ या देशाच्या भू-सीमेशी संलग्न आहे.

vii. भूतान देशाची भू-सीमा ही सिक्कीम, पश्चिम बंगाल, आसाम आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांशी संलग्न आहे.

viii. अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम या राज्यांची सीमारेषा ही म्यानमार देशाच्या भू-सीमेशी संलग्न आहे.

ix. बांग्लादेशाची भू-सीमा ही पश्चिम बंगाल, आसाम, मेघालय, त्रिपुरा आणि मिझोराम या भारतीय राज्यांच्या भू-सीमेशी संलग्न आहे.

**३. भारताची सागरी सीमा** **[ऑक्टोबर १४]**

**उत्तर:** i. भारताची सागरी सीमा सुमारे ७,५१७ किमी लांबीची आहे.

ii. भारताच्या पश्चिम आणि नैऋत्य दिशेला अरबी समुद्र आहे.

iii. भारताच्या पूर्व आणि आग्नेय दिशेला बंगालचा उपसागर आहे.

iv. दक्षिणेला हिंदी महासागर आहे.

v. श्रीलंका आणि भारत यांच्यामध्ये मानारचे आखात आणि पाल्कची अरुंद सामुद्रधुनी आहे.

vi. भारताची सागरी सरहद्द पाकिस्तान, श्रीलंका, मालदीव, इंडोनेशिया, बांग्लादेश आणि म्यानमार या देशांच्या सागरी सीमांशी संलग्न आहे.

### १.४ प्रदेश निश्चितीची प्रक्रिया

**४. प्रदेश**

**उत्तर:** i. प्रदेश समान वैशिष्ट्यांच्या आधारे निश्चित करतात. सलगता व समानता ही त्यांची वैशिष्ट्ये असतात. प्रदेश म्हणजे एक असा भाग जो भौगोलिकदृष्ट्या छोटा किंवा मोठा असू शकतो.

ii. प्रत्येक प्रदेशाची एक किंवा अधिक गाभा क्षेत्रे असतात. गाभा क्षेत्रांमध्ये भौगोलिक आकृतिबंध उत्कृष्टरीत्या विकसित झालेला असतो. या गाभा क्षेत्रांच्या सभोवती हे वैशिष्ट्य कमी प्रमाणात दिसून येते; मात्र त्या प्रदेशाचे प्रमुख वैशिष्ट्य पूर्णपणे दिसेनासे होत नाही.

iii. तो प्रदेश डोंगराळ किंवा मैदानी क्षेत्र असू शकतो. त्याचप्रमाणे तो शहरी किंवा ग्रामीणसुद्धा असू शकतो.
iv. प्रदेश मध्यवर्ती असू शकतात. एखाद्या मध्यवर्ती ठिकाणी चाललेल्या कार्यामुळे ते ओळखले जाऊ शकतात. उदाहरणार्थ - एखादे नगर व त्याच्या आसपासचा परिसर.
v. एखाद्या वैशिष्ट्याचे एकजिनसी वितरण ही त्या प्रदेशाची ओळख बनू शकते.
उदा. सूचिपर्णी वने, उष्णकटिबंधीय वने इ.

## १.५ प्राकृतिक विभाग

***५. उत्तरेकडील मैदानी प्रदेशाची वैशिष्ट्ये**

**उत्तर:** i. उत्तरेकडील भारतीय मैदाने म्हणजे गाळाच्या मृदेचा एक सलग पट्टा आहे ज्याची जाडी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाढत जाते.
ii. या प्रदेशातील उतारही मंद स्वरूपाचा आहे.
iii. नद्या संथपणे वाहतात, त्यामुळे गाळाची मैदाने तयार झालेली आहेत.
iv. येथील मृदा अत्यंत सुपीक असल्याने हा विभाग भारतातील शेती व्यवसायाच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचा आहे.
v. या विभागातील लोकसंख्येची घनता अधिक आहे आणि पायाभूत सुविधांचा सर्वत्र विकास झालेला आहे. राजस्थानचे वाळवंट याला अपवाद आहे.

**६. द्वीपकल्पीय पठार**

**उत्तर:** i. द्वीपकल्पीय पठार हे जगातील सर्वांत प्राचीन भूभागांपैकी एक आहे आणि ते स्थिर आहे.
ii. भारतातील हा सर्वांत मोठा नैसर्गिक विभाग आहे आणि त्याचा आकार त्रिकोणी आहे.
iii. हा प्रदेश प्राचीन अग्निजन्य व रूपांतरित खडकांनी बनलेला आहे.
iv. येथील भूरूपांची अनेक वैशिष्ट्ये प्रस्तरभंग आणि ज्वालामुखीच्या हालचालींनी बनलेली आहेत.
v. क्षितिजसमांतर पसरलेला घनरूप लाव्हाचा थर हे या प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे.
vi. खडकाळ टेकड्या, पठारे, विखुरलेल्या कमी उंचीच्या टेकड्या आणि अनेक प्रस्तरभंग येथे दिसून येतात.
vii. या प्रदेशात सुपीक काळी मृदा असून हा प्रदेश खनिज संपत्तीने संपन्न आहे.
viii. या प्रदेशात मनुष्यवस्त्यांचे वितरण असमान आहे.

***७. भारतीय बेटे**

**उत्तर:** बेटांचे दोन विभाग आहेत:
i. अरबी समुद्रातील बेटे
ii. बंगालच्या उपसागरातील बेटे

**i. अरबी समुद्रातील बेटे:**
लक्षद्वीप, मिनिकॉय आणि अमिनदिवी बेटे हा अरबी समुद्रातील बेटांचा समूह आहे.
भारताच्या नैऋत्य किनाऱ्यापासून २०० ते ४४० किमी दूर ती स्थित आहेत.
ही बेटे म्हणजे भारताचा सर्वांत लहान केंद्रशासित प्रदेश आहे.
या केंद्रशासित प्रदेशाची राजधानी कवरत्ती ही आहे.

**ii. बंगालच्या उपसागरातील बेटे:**
अंदमान आणि निकोबार बेटे या बेटांचा बंगालच्या उपसागरातील बेटांमध्ये समावेश होतो.
एक मध्यवर्ती पर्वतरांग आणि त्या बेटांवर अनेक अरुंद दऱ्या ही उत्तर अंदमान बेटाची प्राकृतिक वैशिष्ट्ये आहेत.
छोटा अंदमान जवळजवळ सपाट आहे. फक्त त्याच्या उत्तरेला टेकड्यांची रांग आहे.
निकोबार बेटे ही जलमग्न पर्वतरांगेची शिखरे आहेत आणि हा भाग प्रामुख्याने डोंगराळ आहे.
छोट्या प्रवाहामुळे निकोबार बेटांच्या पृष्ठभागाचे ठिकठिकाणी अपक्षरण झाले आहे.
या बेटांवर प्रवाहांमुळे तयार झालेल्या खोलगट भागात गाळ साचून तेथे गाळाची मैदाने तयार झाली आहेत.

## प्र.४. खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा.

## १.१ प्रस्तावना

**१. भारत ही विविधता असलेली भूमी आहे.**

**उत्तर:** i. भारताचा विस्तार मोठा असून वेगवेगळ्या प्रकारची भौगोलिक विविधता येथे आहे. त्याचे प्रतिबिंब विविध नैसर्गिक स्रोतांतून दिसून येते.

ii. भारताचा विस्तार उत्तरेकडील हिमालयाच्या बर्फाच्छादित पर्वतरांगांपासून ते दक्षिणेला कन्याकुमारीपर्यंत आहे.

iii. भारतात विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती आहे.

iv. उदा. सूर्यप्रकाश, सुपीक मृदा, पाणी, खनिजे, वनस्पती, प्राणिजीवन इत्यादी.

म्हणून भारत ही विविधता असलेली भूमी आहे.

## १.४ प्रदेश निश्चितीची प्रक्रिया

***२. भूगोलाच्या अभ्यासात प्रादेशिक दृष्टिकोन हा अत्यंत महत्त्वाचा असतो. [मार्च १५]**

**उत्तर:** i. प्रादेशिक दृष्टिकोन विशिष्ट क्षेत्रावर केंद्रित होतो.

ii. प्रादेशिक दृष्टिकोनात प्राकृतिक घटक आणि मानवी घटक यांमध्ये सातत्याने होणाऱ्या आंतरक्रियांचा व त्यांच्या एकत्रित कार्यांचा अभ्यास केला जातो.

iii. प्राकृतिक घटक व मानवी घटक सापेक्ष एकजिनसीपणा प्रदान करतात. एकजिनसीपणा हा प्रादेशिक दृष्टिकोनाचा पाया आहे.

iv. प्रादेशिक दृष्टिकोन म्हणजे विविध अवकाशीय वैशिष्ट्यांचा केलेला सूत्रबद्ध अभ्यास होय.

म्हणून, भूगोलाच्या अभ्यासात प्रादेशिक दृष्टिकोन हा अत्यंत महत्त्वाचा आहे.

***३. प्रादेशिकीकरण अत्यंत आवश्यक आहे. [मार्च १४, जुलै १५]**

**उत्तर:** i. क्षेत्राला अनेक छोट्या विभागांमध्ये विभागण्याच्या प्रक्रियेला प्रादेशिकीकरण म्हणतात.

ii. उदा. देशाची विभागणी राज्यांमध्ये, राज्यांची जिल्ह्यांमध्ये इत्यादी.

iii. प्रदेश हा आर्थिक विकासाचा पाया आहे. विविध समस्या सोडविण्यासाठी छोटे प्रदेश असणे आवश्यक असते.

iv. प्रादेशिकीकरण हे अनेक ऐतिहासिक, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक विश्लेषणांसाठी महत्त्वाचे आहे.

म्हणून, प्रादेशिकीकरण अत्यंत आवश्यक आहे.

**प्र.५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

## १.३ सभोवतालची राष्ट्रे

**१. हिमालय पर्वताची निर्मिती कशी झाली आहे?**

**उत्तर:** हिमालयाचा भूभाग इतर विभागाच्या तुलनेने नवीन आहे. तो अस्थिर आहे. त्यामध्ये उंच शिखरे, खोल दऱ्या आणि वेगाने वाहणाऱ्या नद्या आहेत. हिमालय पर्वताची निर्मिती खालीलप्रमाणे झाली:

i. पृथ्वीच्या अंतर्गत भागातील ऊर्ध्वगामी प्रवाहांमुळे गोंडवन या भूभागाचे तुकड्यांमध्ये विभाजन झाले.

ii. गोंडवन भूभागापासून अलग झाल्यावर इंडो-ऑस्ट्रेलियन भूपट्टा उत्तरेकडे वाहत गेला.

iii. वाहत जाताना या भूपट्ट्याची युरेशियन या मोठ्या भूपट्ट्याशी टक्कर झाली.

iv. या टकरीमुळे टेथिस सागराच्या तळाशी तयार झालेले गाळाचे खडक घडीच्या/वळीच्या रूपाने वर आले व हिमालय पर्वताची निर्मिती झाली.




**२. भारताच्या रचनेतील भूविज्ञान प्रक्रियेची माहिती लिहा.**

**उत्तर:** i. भारताची सध्याची प्राकृतिक रचना ही एका मोठ्या भूविज्ञान प्रक्रियेचा परिणाम आहे.

ii. भारताचे प्राकृतिकदृष्ट्या सर्वसाधारण तीन विभाग आहेत.

अ. हिमालय पर्वतरांगा

ब. उत्तरेकडील मैदान

क. द्वीपकल्पीय पठार

iii. गोंडवन भूभागापासून विलग झाल्यावर इंडो-ऑस्ट्रेलियन भूपट्टा उत्तरेकडे वाहत जाताना त्याची युरेशियन या मोठ्या भूपट्ट्याशी टक्कर झाली.

iv. या टकरीमुळे टेथिस सागराच्या तळाशी तयार झालेले गाळाचे खडक घडीच्या/वळीच्या रूपाने वर आले व हिमालय पर्वताची निर्मिती झाली.

v. इंडो-ऑस्ट्रेलियन भूपट्ट्याच्या हालचालीमुळे भूकवचावर ताण पडला, त्यामुळे वळ्या पडणे, प्रस्तरभंग आणि ज्वालामुखीसारख्या क्रिया घडल्या. ज्वालामुखीच्या क्रियेतून हिमालयाबरोबरच अंदमान आणि निकोबार ही बेटे निर्माण झाली असावीत असे मानले जाते.

vi. काळाच्या ओघात नव्याने उंचावलेला हिमालय पर्वत आणि प्राचीन द्वीपकल्पीय पठार यांदरम्यान असणारा खोलगट भाग हा उत्तरेकडील हिमालयातून व दक्षिणेतील द्वीपकल्पीय पठारांवरून वाहणाऱ्या नद्यांच्या गाळामुळे हळूहळू भरला गेला.

vii. मोठ्या प्रमाणात गाळ साठवल्यामुळे भारतातील उत्तरेकडील भागात गाळाची विस्तृत मैदाने तयार झाली.

viii. द्वीपकल्पीय पठार मुख्यत: अग्निजन्य आणि रूपांतरित खडकांनी आच्छादलेले आहे. त्यावर कमी उताराच्या टेकड्या आणि रुंद दऱ्या आहेत.

ix. भारतात पृथ्वीवरील सर्व प्रमुख प्राकृतिक वैशिष्ट्ये आढळतात. उदा. पर्वत, मैदाने, वाळवंटे, पठारे आणि बेटे इ.

x. भूवैज्ञानिक घडामोडींशिवाय अपक्षय, अपक्षरण, निक्षेपण यांसारख्या प्रक्रियांनी सध्याची प्राकृतिक रचना तयार झाली आहे.




## १.४ प्रदेश निश्चितीची प्रक्रिया

***३. प्रदेश निश्चिती कशी केली जाते?**

**उत्तर:** i. क्षेत्राला अनेक छोट्या विभागांमध्ये विभागण्याच्या प्रक्रियेला प्रादेशिकीकरण म्हणतात.

ii. प्रदेश हे सलगता आणि समानता या वैशिष्ट्यांच्या आधारे निश्चित केले जातात.

iii. प्रदेश हे एक किंवा एकापेक्षा अधिक घटकांच्या आधारेही निश्चित केले जातात. जसे:

**अ. आर्थिक प्रदेश:** हे उद्योग, वाहतूक, विकासाचे स्तर इत्यादी आर्थिक घटकांवर आधारित असतात.

**ब. शेतीशी संबंधित प्रदेश:** हे पिकांनुसार अथवा पिकांच्या संयुक्तिकरणानुसार ठरवले जातात.

**क. सामाजिक आणि सांस्कृतिक प्रदेश:** हे लोकसंख्या, लिंग गुणोत्तर, भाषा इत्यादी घटकांनुसार ठरवले जातात.

**ड. प्राकृतिक प्रदेश:** प्रदेशाची उत्पत्ती, स्थान, भूरूपे, हवामान, वने, मृदा, खडकांचे प्रकार इत्यादी प्राकृतिक घटकांच्या आधारे ठरवले जातात.

**इ. राजकीय आणि प्रशासकीय प्रदेश:** या प्रदेशांची श्रेणीरचना देश, राज्य, जिल्हा, तालुका, गट याप्रमाणे असू शकते.

## १.५ प्राकृतिक विभाग

***४. हिमालयाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. हिमालय पर्वतरांगा या सर्वांत अर्वाचीन घडीच्या पर्वतरांगा असून, या पर्वतरांगा म्हणजे जगातील सर्वांत उंच उठावाचा प्रदेश आहे.

ii. या पर्वतरांगांचा गाभा कणाश्म खडकांनी बनलेला असून, दुतर्फा रूपांतरित झालेले गाळाचे खडक आहेत.

iii. हा प्रदेश अतिशय असमान भूरूपे, तीव्र उतार, अत्युच्च बर्फाच्छादित शिखरे, थंड हवामान, अरुंद खोल दऱ्या, वेगाने वाहणाऱ्या नद्या ही हिमालयाची वैशिष्ट्ये आहेत.

iv. तेथे रस्त्यांची संख्या कमी आहे. विखुरलेल्या शेतजमिनींचे डोंगरउतारांवर सपाट तुकडे पायऱ्यांप्रमाणे आहेत. हा एक बहुतांश ठिकाणी मनुष्यवस्ती नसलेला विस्तारित भूप्रदेश आहे.

v. पूर्वेकडील भागात खूप जास्त पर्जन्यमान, नैसर्गिक वनस्पतींची दाटीवाटीने झालेली वाढ आणि दूरवर पसरलेले विविध सांस्कृतिक समूह आहेत. ते विखुरलेल्या वस्त्यांमधून राहतात.

[प्रश्न क्र. ५ (१) चा नकाशा पाहावा.]

***५. किनारी मैदानांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**उत्तर:** किनारी मैदानी प्रदेश हा त्याच्या स्थानानुसार दोन भागांत विभागला जातो.

i. पश्चिम किनारी मैदानी प्रदेश.

ii. पूर्व किनारी मैदानी प्रदेश.

**i. पश्चिम किनारी मैदानी प्रदेश:**

मोसमी नद्या, उंच उठाव, विच्छेदित भूभाग, प्रस्तरभंग झालेल्या संरचना, दंतुर किनारपट्टी, घळ्या आणि तीव्र उताराचे कडे ही पश्चिम किनारी मैदानी प्रदेशाची वैशिष्ट्ये आहेत.

या किनारपट्टीवर अनेक खाड्या, भूशिरे, एकमुखी नद्या, खाजण, दलदल, पश्चजल, क्षारयुक्त पाणथळ जमीन, खारफुटीची अथवा कच्छवृक्षाची वने, स्वच्छ आणि सुंदर किनारे आहेत.

**ii. पूर्व किनारी मैदानी प्रदेश:**

त्रिभुज मैदानी प्रदेश हे पूर्वेकडील किनारी प्रदेशांचे वैशिष्ट्य आहे. ही मैदाने नद्यांनी वाहून आणलेल्या गाळाच्या संचयनामुळे निर्माण झाली आहेत.

महानदी, गोदावरी, कृष्णा आणि कावेरी इ. नद्यांमुळे तयार झालेले विस्तृत त्रिभुज प्रदेश ही या किनारपट्टीची वैशिष्ट्ये आहेत.




## प्र.६. नकाशा वाचन

**अ. भूगोलाच्या पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्रमांक ३ वरील आकृती १.२ चे निरीक्षण करा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१. भारताच्या समुद्रसपाटीपेक्षा खोल भूभागाचे नाव लिहा.**

**उत्तर:** कुट्टानद हे भारताच्या समुद्रसपाटीपेक्षा खोल भूभागाचे नाव आहे.

**२. भारतातील सर्वाधिक उंच शिखराचे नाव लिहा.**

**उत्तर:** के-२ हे भारतातील सर्वाधिक उंच शिखर आहे.

**३. भारतातील सर्वांत पूर्वेला असणाऱ्या गावाचे नाव लिहा.**

**उत्तर:** किबिथू हे भारतातील सर्वांत पूर्वेला असणारे गाव आहे.

**४. भारतातील सर्वांत पश्चिमेला असणाऱ्या गावाचे नाव लिहा.**

**उत्तर:** घुअर मोटा हे सर्वांत पश्चिमेला असणाऱ्या गावाचे नाव आहे.

**५. भारताच्या सर्वांत उत्तरेकडील प्रदेशाचे नाव लिहा.**

**उत्तर:** दफ्दार हे भारताच्या सर्वांत उत्तरेकडील गावाचे नाव आहे.

**६. भारताच्या मुख्य भूमीच्या दक्षिण टोकाचे नाव लिहा.**

**उत्तर:** कन्याकुमारी हे भारताच्या मुख्य भूमीच्या दक्षिण टोकाचे नाव आहे.

**ब. भूगोलाच्या पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्रमांक ४ वरील आकृती १.३ चे निरीक्षण करा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१. तिन्ही बाजूंनी भारताच्या सीमेने वेढलेल्या दोन राष्ट्रांची नावे लिहा.**

**उत्तर:** नेपाळ आणि बांग्लादेश हे दोन देश तिन्ही बाजूंनी भारताच्या सीमेने वेढलेले आहेत.

**२. भारताच्या वायव्य दिशेला असणाऱ्या देशाचे नाव लिहा.**

**उत्तर:** पाकिस्तान हे राष्ट्र भारताच्या वायव्य दिशेला आहे.

**३. भारताच्या पूर्वेला असणाऱ्या समुद्राचे नाव सांगा.**

**उत्तर:** बंगालचा उपसागर हा भारताच्या पूर्वेला आहे.

**४. भारताच्या आग्नेय दिशेला असणाऱ्या परदेशी राष्ट्राचे नाव लिहा.**

**उत्तर:** श्रीलंका हे राष्ट्र भारताच्या आग्नेय दिशेला आहे.

**५. कोणत्या देशाची सर्वांत छोटी सीमारेषा भारतीय सीमारेषेशी संलग्न आहे?**

**उत्तर:** अफगाणिस्तानची सर्वांत छोटी सीमारेषा भारताच्या सीमारेषेशी संलग्न आहे.

## प्र.७.अ. भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील बाबी दाखवा आणि त्यांना नावे द्या. (सूची आवश्यक)

***१. लक्षद्वीप** [मार्च १४]

***२. पाल्कची सामुद्रधुनी** [मार्च १४]

***३. भारतातील सर्वाधिक उंच शिखर** [ऑक्टोबर १४, जुलै १५]

***४. पश्चिम किनारी मैदाने**

**५. राष्ट्रीय महामार्ग : मुंबई-अहमदाबाद-दिल्ली** [ऑक्टोबर १४]

***६. कर्कवृत्त**

***७. समुद्रसपाटीपेक्षा खोल भूभाग**

***८. ८२°३०' पूर्व प्रमाण रेखावृत्त**

**९. लहान राज्य – गोवा**

**१०. मोठे राज्य – राजस्थान**

**११. महानदीचा त्रिभुज प्रदेश**

**१२. कन्याकुमारी** [जुलै १५]

**उत्तर:** नकाशात वरील बाबी दर्शविल्या आहेत:



**ब. भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील बाबी दाखवा आणि त्यांना नावे द्या. (सूची आवश्यक)**

**१. उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश**
**२. उत्तरेकडील भारतीय मैदाने**
**३. द्वीपकल्पीय पठार**
**४. घाट आणि किनारी मैदानी प्रदेश**
**५. बेटे.**

**उत्तर:** नकाशात वरील बाबी खालीलप्रमाणे दर्शविल्या आहेत:



## द्रुत पुनरावलोकन

**भारत**

**अधिकृत नाव – भारत**

**राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश:** २९ राज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेश

**स्थान:**

➢ उत्तर आणि पूर्व गोलार्धात.

➢ आशिया खंडाच्या दक्षिण भागात मध्यवर्ती ठिकाणी.

➢ मध्यभागातून कर्कवृत्त जाते.

**विस्तार:**

➢ अक्षवृत्तीय विस्तार: ८°४'२८'' ते ३७°६'५३'' उत्तर म्हणजेच सुमारे २९°२'२५''

➢ रेखावृत्तीय विस्तार: ६८°७'३३'' ते ९७°२४'४७'' पूर्व म्हणजेच सुमारे २९°१७'१४''

➢ एकूण भूभाग क्षेत्रफळ: ३२,८७,२६३ चौकिमी

➢ भू-सीमा:१५,२०० किमी

➢ सागरी किनारा: ७,५१७ किमी

**वस्तुस्थिती आणि वैशिष्ट्ये:**

➢ **क्षेत्रफळाच्या दृष्टीने:**
जगातील सातव्या क्रमांकाचा मोठा देश.
सर्वांत मोठे राज्य: राजस्थान. (मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र त्याच्या खालोखाल)
सर्वांत लहान राज्य: गोवा.

➢ **अंतराच्या दृष्टीने:**
गुजरातमधील सर्वांत पश्चिमेकडील टोक (घुअर मोटा) → अरुणाचल प्रदेशातील सर्वांत पूर्वेकडील टोक (किबिथू गाव), अंतर → २९९३ किमी
काश्मीरमधील सर्वांत उत्तरेकडील टोक (दफ्दार) → मुख्य भूमीतील दक्षिणेकडील टोक (कन्याकुमारी),अंतर → ३२१४ किमी

➢ **भूवैज्ञानिक दृष्टीने:**
भूवैज्ञानिकदृष्ट्या तीन विभाग: हिमालय पर्वतरांगा, उत्तरेकडील मैदान, द्वीपकल्पीय पठार.
दक्षिणेकडील परमस्थान (भारतीय द्वीपकल्पातील): तामिळनाडूमधील कन्याकुमारी.
दक्षिणेकडील परमस्थान (भारताच्या मुख्य भूप्रदेशापासून दूर): निकोबारमधील इंदिरा पॉइंट.
समुद्रसपाटीपासून खोल भूभागाचा बिंदू: केरळमधील कुट्टानद (-२.२मीटर).

➢ **भारताची प्रमाण वेळ (IST):**
अलाहाबादमधून जाणारे ८२°३०' पूर्व रेखावृत्त हे प्रमाण रेखावृत्त आहे.
वेळेचा फरक ( मोठा आणि लहान दिवस):
लडाख प्रदेशातील लेह जवळ : ४ तासांचा फरक.
कन्याकुमारीजवळ : ४५ मिनिटे.
सूर्योदयातील वेळेचा फरक:
पूर्वेला किबिथू गाव (अरुणाचल प्रदेश) आणि पश्चिमेकडील गुजरातमधील (सर खाडीजवळ) घुअर मोटा: ११६ मिनिटे.

➢ **सामाईक भू-सीमा असणारी राज्ये व भू-सीमेच्या लांबीची टक्केवारी:**
पाकिस्तान (२२%), अफगाणिस्तान (०.७ %), चीन (२३%), नेपाळ (१२%), भूतान (४.५%), म्यानमार (१०.८%), बांग्लादेश (२७%).

- **सभोवतालची सागरी सीमा:**
  अरबी समुद्र (पश्चिम आणि नैऋत्य दिशेला), बंगालचा उपसागर (पूर्व आणि आग्नेय दिशेला) आणि हिंदी महासागर (दक्षिणेला).
- **भारताशी सामाईक सागरी सीमा असणारी राष्ट्रे:**
  पाकिस्तान, श्रीलंका, मालदीव, इंडोनेशिया, बांग्लादेश आणि म्यानमार.




- **प्रादेशिकीकरण:**
  समान वैशिष्ट्यांच्या आधारे केलेल्या प्रदेशनिश्चितीला प्रादेशिकीकरण म्हणतात.
  एकजिनसीपणा हा प्रादेशिक दृष्टिकोनाचा पाया आहे.



## प्रश्नपत्रिका

**एकूण गुण: २०**

**१. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** [३]

i. क्षेत्रफळाच्या दृष्टीने __________ हे भारतातील सर्वांत लहान राज्य आहे.
(मिझोराम, गोवा, त्रिपुरा, आसाम)

ii. __________ भूपट्ट्याच्या उत्तर दिशेकडे सरकण्यामुळे भारतीय उपखंडाचा आकार आणि स्थान बदलत राहिले.
(इंडो-ऑस्ट्रेलियन, युरेशिया, लॉरेशिया, इंडो - गँगेटीक)

iii. __________ विभागात लोकसंख्येची घनता अधिक आहे.
(हिमालय, बेटे, उत्तरेकडील मैदान, भारतीय पठार)

**२. 'अ ' स्तंभातील घटकांशी 'ब' स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा :** [३]

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| i. | आर्थिक प्रदेश | (अ) | लोकसंख्या |
| ii. | उत्तरेकडील मैदाने | (ब) | उद्योगधंदे |
| iii. | घुअर मोटा | (क) | अरुणाचल प्रदेश |
| | | (ड) | गाळांच्या मृदेचा पट्टा |
| | | (इ) | गुजरात |

**३. पुढील विधानांची भौगोलिक कारणे द्या (कोणतीही दोन) :** [४]

i. भारत ही विविधता असलेली भूमी आहे.
ii. भूगोलाच्या अभ्यासात प्रादेशिक दृष्टिकोन हा अत्यंत महत्त्वाचा असतो.
iii. प्रादेशिकीकरण अत्यंत आवश्यक आहे.

**४. थोडक्यात टिपा लिहा (कोणतीही एक) :** [२]

i. भारताची सागरी सीमा.
ii. द्वीपकल्पीय पठार

**५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही एक) :** [४]

i. प्रदेश निश्चिती कशी केली जाते?
ii. किनारी मैदानांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**६. तुमच्या भूगोलाच्या पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्रमांक ३ वरील आकृती १.२ चे निरीक्षण करा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** [४]

i. भारतातील समुद्रसपाटीपेक्षा खोल भूभागाचे नाव लिहा.
ii. भारतातील सर्वाधिक उंच शिखराचे नाव लिहा.
iii. भारतातील सर्वांत पूर्वेकडील ठिकाणाचे नाव लिहा.
iv. भारताच्या मुख्य भूमीतील दक्षिणेकडील टोकाचे नाव लिहा.